# सातारा जिल्हा परिषद,सातारा

## सामान्य प्रशासन विभाग

---

**महत्वाचे**

जा.क्र.साप्रवि/आस्था-1(5)/अनुकंपा/2019
दिनांक -: 25.09.2019
05-10-2019

प्रति,

सर्व खाते प्रमुख,------------------
सातारा जिल्हा परिषद,सातारा
सर्व गट विकास अधिकारी,
पंचायत समिती -------------------

**विषय :- शासकीय सेवेत असंताना दिवंगत झालेल्या कर्मचा-यांच्या नातेवाईकांस अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबत.**

संदर्भ :- 1. महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय,क्रमांक अकंपा-1095/प्र.क्र.34-अ/ आठ, दिनांक 23 ऑगस्ट 1996
2. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय,क्रमांक अकंपा-1004/ प्र.क्र. 51/ 2004/आठ, दिनांक 22 ऑगस्ट 2005

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, संदर्भीय शासन निर्णय क्रमांक 1 मधील 6 नुसार मृत होणा-या शासकीय कर्मचा-यांच्या नातेवाईकाला शासकीय कर्मचा-यांच्या मृत्यूनंतर 15 दिवसानंतर किंवा कुटूंब निवृत्तीवेतनाची कागदपत्रे पाठविताना अनुकंपा तत्वावर नियुक्तीच्या योजनेची माहिती देण्याची जबाबदारी संबंधित आस्थापना अधिका-यांची आहे. परंतु संबंधित आस्थापना अधिकारी शासकीय कर्मचा-यांच्या नातेवाईकांना अनुकंपा तत्वावरील नियुक्ती योजनाबाबतची माहिती लेखी स्वरुपात देत नसल्याचे माझे निदर्शनास आलेले आहे.

तरी सर्व संबंधित आस्थापना अधिकारी यांनी अनुकंपा तत्वावर नियुक्तीच्या योजनेची माहिती शासकीय कर्मचा-यांच्या मृत्यूनंतर 15 दिवसानंतर किंवा कुटूंब निवृत्तीवेतनाची कागदपत्रे पाठविताना शासकीय कर्मचा-यांच्या कुटूंबियांना त्वरीत उपलब्ध करुन देण्याची आहे. सदर बाबत आपले अधिनस्त असलेल्या सर्व कार्यालयांना आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे. संबंधित आस्थापना अधिकारी यांनी शासकीय कर्मचा-यांच्या नातेवाईकास अनुकंपा तत्वावर नियुक्तीच्या योजनेची माहिती दिली नाही, तर संबंधित आस्थापना अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल यांची नोंद घ्यावी. अनुकंपा तत्वावरील नियुक्ती योजनेची माहिती मिळाल्याबाबत शासकीय कर्मचा-याच्या कुटूंबियांकडून पोच घेवून त्यांची मुळ प्रत सामान्य प्रशासन विभाग,सातारा जिल्हा परिषद,सातारा यांच्याकडे पाठविण्यात यावी व एक प्रत संबंधिताच्या मुळ सेवापुस्तकामध्ये जतन करुन ठेवण्यात यावी.

संदर्भीय शासन निर्णय 2 नुसार अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र कुटूंबियांकडून संबंधित नियुक्ती प्राधिका-यांकडे अर्ज करण्याची सध्याची 5 वर्षाची मुदत कमी करुन **कर्मचारी दिवंगत झाल्यांच्या दिनांकापासून एक वर्षाच्या मुदतीत अर्ज करणे आवश्यक आहे** असे नमुद आहे. त्यानुसार संबंधित मृत शासकीय कर्मचा-यांच्या नातेवाईकांना लेखी स्वरुपात माहिती देण्यात यावी.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय,क्रमांकअकंपा-1004/प्र.क्र.51/2004/आठ, दिनांक 22 ऑगस्ट 2005 नुसार **कर्मचारी कर्करोग,पक्षाघात किंवा अपघात यामुळे सेवेसाठी कायमचा असमर्थ ठरुन रुग्णता निवृत्त झाल्यास त्यांच्या कुटूंबियाना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याची सवलत रद्द करण्यात आलेली आहे.**

Snbhagwat 5.10.19
( संजय भागवत )
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**सातारा जिल्हा परिषद,सातारा**
**Email: ceozpstr@gmail.com**
**Mobile no. 9722993333**

प्रत :- मा.विभागीय आयुक्त,पुणे विभाग पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत-: श्री.नटराज पाटील,जिल्हा प्रकल्प प्रमुख,संगणक कक्ष,सातारा जिल्हा परिषद,सातारा यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

Scanned by CamScanner